

आर्थिक विकास, सहकार आणि सामाजिक न्यायात राज्याची आघाडी

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 17/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 157 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# अंबादास दानवे यांचा विधान परिषदेत निरोप समारंभ गाजला!

## उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे आले आमने-सामने



>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ येत्या २९ ऑगस्ट रोजी (४४ दिवसांनी) पूर्ण होत आहे. त्यामुळे त्यांच्या निरोपादाखल बुधवारी (१७ जुलै) विधान परिषदेत संपन्न झालं.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाषणं केली. एकनाथ शिंदे यांनी या भाषणात अंबादास दानवे यांचं कौतुक केलं. पाठोपाठ विधान परिषद सदस्य उद्धव ठाकरे यांनी देखील यावेळी भाषण केलं

.

या भाषणावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, “अंबादास दानवे हे त्यांचा या सभागृहातील पहिला कार्यकाळ पूर्ण करत आहेत. यानिमित्त त्यांनी आज सभागृहात ‘मी पुन्हा येईन’ असं जोरात बोललं पाहिजे. कारण त्याला महत्त्व आहे. फक्त ‘आहे त्याच पक्षातून’ असंही बोला. आज अनेकजण अंबादास दानवे यांचं कौतुक करत आहेत. मात्र, काही वर्षांपूर्वी मी दानवे यांना उमेदवारी दिली तेव्हा त्यांचे चेहरे वेगळे होते.” ते म्हणाले, “आज सकाळी अंबादास दानवे यांनी आंदोलन केलं. त्या आंदोलनातील भेटवस्तू मुख्यमंत्र्यांना द्यायची आहे तो भाग वेगळा. मात्र, मला या यशस्वी कारकिर्दीसाठी अंबादास दानवे यांचा अभिमान वाटतो. शिवसेनाप्रमुखांना (दिवंगत बाळासाहेब ठाकरे) देखील त्यांचा अभिमान वाटत असेल, काहीशी हळहळही वाटत असेल. सहाजिक आहे की आपण किती शिकलो यापेक्षा आपण काय शिकलो याला अधिक महत्त्व आहे. त्याचा जममाणसांसाठी काय उपयोग करून देतो हे देखील महत्वाचे आहे. अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभ प्रसंगी माजी मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे व माजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमने-सामने आल्याचे पहावयास मिळाले.

निरोप समारंभाच्या शेवटी विधानपरिषद व विधानसभेचे सर्व आमदार एकत्र येऊन फोटो काढत असताना एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे हे आमने-सामने आले. एकनाथ शिंदे यांच्या शेजारीच उद्धव ठाकरे यांना बसण्याची विनंती नीलम गोऱ्हे यांनी केली, परंतु एक खुर्ची सोडून उद्धव ठाकरे यांनी बसण्याची पसंती दर्शवली.

फक्त एक खुर्ची सोडून एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे हे फोटोच्या एकाच फ्रेम मध्ये आल्याचे यावेळी पहावयास मिळाले.

# इंटिग्रेटेड महाविद्यालयांसाठी नवा कायदा ; शिक्षणमंत्री भूसे यांची घोषणा



>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

राज्यातील शाळांमध्ये विविध मार्गांनी बेकायदेशीर शुल्कवाढ करुन विद्यार्थांची पिळवणूक केली जात असून या बेकायदेशीर शुल्कवाढीवर नियंत्रणासाठी कायद्यात सुधारणा करण्यात येणार आहेत. तसेच काही महाविद्यालये सामायिक शिकवणी वर्गांशी (इंटिग्रेटेड) करार करून शिक्षण व्यवस्थेचा गैरवापर करत असून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायदा तयार करण्याची घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी बुधवारी विधान सभेत केली.राज्यातील शाळांमध्ये बेकायदेशीर शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभाग लवकरच नियमांमध्ये सुधारणा करणार आहे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियमा नुसार कोणतीही शाळा मान्यता शुल्कापेक्षा अधिक रक्कम पालकांकडून आकारू शकत नाही. असे केल्यास संबंधित शाळेविरोधात कारवाई केली जाते. अधिनियमानुसार प्रत्येक शाळेत पालक-शिक्षक संघ स्थापन करणे बंधनकारक असून, त्या संघातील कार्यकारी समितीच शुल्कवाढीबाबत निर्णय घेते.

मात्र, सध्याच्या तरतुदींमध्ये काही सुधारणा आवश्यक असल्याने शिक्षण विभागाने त्याचा अभ्यास सुरू केला आहे. शिक्षण हा व्यवसाय नसून सामाजिक बांधिलकीचे कार्य आहे. कोणीही गरजेपेक्षा जास्त शुल्क आकारू नये, ही शासनाची भूमिका असून शिक्षण शुल्क कमी दाखविले जाते मात्र इमारत निधी, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सहल अशा अन्य मार्गाने शुल्कवाढ केली जाते. मात्र आता सर्व शुल्क एकत्रच घ्यावे अशी सुधारणा करण्यात येणार असल्याचे भुसे यांनी सांगितले.

# वाकड येथील 96 झोपड्यांवर महापालिकेची निष्कासनाची कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील वाकड येथील ४५ मीटर रस्त्याच्या रुंदीकरणाला अडथळा ठरणाऱ्या काळाखडक झोपडपट्टीतील सुमारे ४६ हजार चौरस फूट क्षेत्रफळावरील ९६ झोपड्यांवर पिंपरी चिंचवड महापालिकेने निष्कासनाची कारवाई केली आहे.




वाकड येथील रस्ता रुंदीकरणातील अनधिकृत झोपड्या, टपऱ्या, दुकाने व वीट बांधकामे निष्कासित करण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई हाती घेण्यात आली आहे. या कारवाईमध्ये काळाखडक झोपडपट्टीतील २५० मीटर लांबीच्या व १६ मीटर रुंदीच्या क्षेत्रावर असणाऱ्या ९६ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त तथा सक्षम प्राधिकारी अण्णा बोदडे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, किशोर ननावरे, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे, सतीश कसबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र माळी, कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, सुनिल पवार, अभिमान भोसले, सुनिल शिंदे, दिलीप लांडे उपस्थित होते.

'ड' व 'ग' क्षेत्रीय कार्यालय, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, स्थापत्य विभाग, शहरी दळणवळण विभाग (बी.आर.टी.एस.), नगररचना विभाग, विद्युत विभाग व अतिक्रमण विभाग यांनी १ पोकलेन्ड , ७ जेसीबी, ४ डंपर व १५ मजुर यांच्या सहाय्याने ही कारवाई केली आहे. वाकड येथील अतिक्रमण निष्कासनाची कारवाई केल्यानंतर तातडीने पिंपरी चिंचवड महापालिकेने रस्ता रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात केली आहे. या रुंदीकरणाला अडथळा करणारे विद्युत खांब, जलवाहिन्या तसेच इतर सेवा वाहिन्यांचे स्थलांतर करण्याचे नियोजन महापालिकेने केले असून हे काम देखील लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.

वाकड येथील रस्त्याच्या रुंदीकरणामुळे येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे. भूमकर चौक, हिंजवडकडे जाणाऱ्या तसेच हिंजवडीच्या दिशेने थेरगाव, पिंपरी या भागात येणारी वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असून नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.

# ज्योती ताई गोफणे यांच्या वतीने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहर कार्याध्यक्ष तसेच बचत गट महासंघ सेल च्या शहर अध्यक्ष ज्योती ताई गोफणे यांच्या वतीने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा तसेच चिखली पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहावयास मिळत आहे. सदर शिबिराचे उदघाटन राष्ट्रवादी पक्षाच्या महिला शहराध्यक्ष कविताताई अल्हाट, पोलीस उपनिरीक्षक, चिखली पोलीस ठाणे फडतरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. सदर शिबिर मंगळवार दि.१५ जुलै ते २२ जुलै दरम्यान, सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या दरम्यान सुरु राहणार असून सदर शिबिर ज्योतीताई गोफणे यांच्या जनसंपर्क कार्यालय आयोजित केले आहे. यावेळी ओबीसी सेल अध्यक्ष विजुभाऊ लोखंडे, शहर कार्याध्यक्ष फजल भाई शेख, ख्रिश्चन सेल अध्यक्ष डॅनियल दळवी, वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, उपाध्यक्ष आशा मराठे, मेधा पळशीकर, सपना कदम, विकास कृती समिती अध्यक्ष सुनील कदम, विकास गर्ग, सामाजिक कार्यकर्ते अमर शिंदे, राहुल चौधरी ,बबन भागडे ,वसंतराव चिखले, सविता खडतरे ,शैला सातपुते, पुष्पा झिरपे, अलका कुलट, प्रेमा शेट्टी, अर्चना पोंगशे, शोभा पाटील तसेच प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या शिबिराला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. सदर शिबिर चिखली पोलीस ठाणे अंतर्गत सर्व अधिकारी कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी खुले आहे, तरी जास्तीत जास्त नागरिकांनी सदर शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन ज्योतीताई गोफणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# ससून रुग्णालयात तोडफोड ; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




ससून रूग्णालयातील वॉर्ड क्रमांक ४० मध्ये गोंधळ घालून तोडफोड करणाऱ्या महिलेसह दोघांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी प्रवेशद्वाराची काच फोडून ईसीजी यंत्राची तोडफोड केली, तसेच सुरक्षारक्षकाला धमकावून धक्काबुक्की केली.

शासकीय कामात अडथळा आणणे, तसेच तोडफोड केल्याप्रकरणी महिलेसह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुरक्षारक्षक संदीप ज्ञानोबा जाधव (वय २७, रा. सदाआनंदनगर, मंगळवार पेठ) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ससून रुग्णालयात आरोपींच्या नात्यातील एक जण उपचार घेत आहे. सोमवारी (१५ जुलै) दुपारी एकच्या सुमारास ससूनमधील वॉर्ड क्रमांक ४० च्या परिसरात दोघे आले होते. त्यांनी उपचार घेणाऱ्या नातेवाईकाला भेटायचे आहे, असे सांगितले. नातेवाईकांना भेटण्यासाठी वेळ ठरवून दिली आहे. वॉर्डात जाता येणार नाही, असे सुरक्षारक्षक जाधव यांनी दोघांना सांगितले.

या कारणावरुन दोघांनी रुग्णालयाच्या आवारात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. जाधव यांनी त्यांना गोंधळ घालू नका, असे सांगितले. त्यानंतर आरोपींनी सुरक्षारक्षक जाधव आणि सहकाऱ्यांना धक्काबुक्की केली. शिवीगाळ करुन काठीने मारहाण केली. वॉर्ड क्रमांक ४० च्या प्रवेशद्वाराची काच फोडली, तसेच ईसीजी यंत्राची तोडफोड केली.

# लाच स्वीकारताना मंडल अधिकाऱ्यासह दोघांना अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : मावळ तालुक्यातील ३८ गुंठे जमीन नावावर करुन देण्यासाठी मंडल अधिकाऱ्याला दोन लाख रुपयांची, तसेच मध्यस्थाला दहा हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले.

याप्रकरणी मंडल अधिकारी मारूती महादेव चोरमले (वय ५३), तसेच मध्यस्थ जयेश बाळासाहेब बारमुख (वय ३३) यांच्याविरुद्ध भोसरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलमांनव्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

मारूती चोरमले हे शिवणे विभागाचे मंडल अधिकारी आहेत. जयेश बारमुख मध्यस्थ आहे. तक्रारदाराच्या बहिणीने आणि त्यांच्यासोबत अन्य २१ जणांनी एका बांधकाम व्यावसायिकाला १ कोटी ९० लाख रुपये दिले होते. बांधकाम व्यावसायिकासोबत मावळ कुसगाव येथील ३८ गुंठे क्षेत्र विकसन करारनामा केला होता.

२०१८ आणि २०१९ मध्ये संबंधित व्यवहार झाला होता. मात्र, बांधकाम व्यावसायिकाने त्यांची फसवणूक केली. संबंधित जमीन त्याने दुसऱ्या व्यक्तीला खरेदीखत करून विक्री केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 17/07/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# आर्थिक विकास, सहकार आणि सामाजिक न्यायात राज्याची आघाडी

## आमदार अमित गोरखे यांची विधानपरिषदे मध्ये २६० अंतर्गत प्रस्तावावर भाष्य

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात बोलताना महायुती सरकारचे आणि मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करत राज्याच्या विकासाचा सर्वंकष लेखाजोखा सादर केला. यावेळी सभागृहात बोलताना ते म्हणाले की, फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने आर्थिक विकास, गुंतवणूक, सहकार आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली आहे, असे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत आपल्या राज्याने विविध क्षेत्रांमध्ये राबवलेल्या दूरगामी धोरणांमुळे आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे देशात एक 'प्रगतीशील आणि विकासाभिमुख' राज्याची ओळख निर्माण केली आहे.

या सरकारने आर्थिक विकास आणि गुंतवणुकीत महाराष्ट्राला आघाडीवर आणले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राने परकीय थेट गुंतवणूक (FDI) आकर्षित करण्यात आणि स्टार्टअप्सच्या संख्येत देशात आघाडी घेतली, जे जागतिक गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावरील वाढता विश्वास दर्शवते. ₹१२० कोटींचा 'फंड ऑफ फंड्स' तयार करून स्टार्टअप इकोसिस्टमला बळकटी दिली, ज्यामुळे नवोदित उद्योजकांना मोठे आर्थिक पाठबळ मिळाले. तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दावोस येथे झालेल्या जागतिक परिषदेत ६३ कंपन्यांशी ₹१५ लाख ७२ हजार कोटी रुपयांचे विक्रमी सामंजस्य करार झाले, ज्यामुळे लाखो नवीन रोजगार निर्माण होण्यास आणि राज्याच्या महसुलात भरीव वाढ होण्यास मदत झाली. 'सर्क्युलर इकॉनॉमी'वर भर दिल्याने महाराष्ट्र देशाची 'स्टार्टअप राजधानी' म्हणून नावारूपाला येत आहे, असेही यावेळी त्यांच्याकडून सांगण्यात आले.

आमदार अमित गोरखे पुढे बोलताना म्हणाले की, सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देत 'सहकारातून समृद्धी'चे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारने अनेक अभिनव योजना सरकारने राबवल्या. केंद्रात 'सहकार मंत्रालयाची' स्थापना हे केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयाचे ऐतिहासिक पाऊल होते. कृषी आणि सहकारी संस्थांच्या संगणकीकरणाची ५ वर्षांसाठी अंमलबजावणी करून पारदर्शकता वाढवली, तर 'अटल अर्थसहाय्य योजनेस' मुदतवाढ देऊन अनेक संस्थांना आर्थिक स्थैर्य दिले.

तसेच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासालाही सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले. आदिवासी उपाययोजनेच्या तरतुदीत मागील वर्षांच्या तुलनेत ४०% एवढी भरीव वाढ केली.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदिवासी आश्रमशाळा, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून आदिवासींच्या आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली.

# निळू फुले नाट्यगृह ऑनलाईन बुकिंग रद्द करा ; भाजप शहराध्यक्षांची मागणी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



भाजपा शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न (बापु) काटे यांनी पालिका आयुक्त श्री शेखर सिंह यांना लेखी निवेदणाद्वारे निळू फुले नाट्यगृह संदर्भातील काही प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले आहे.

आपल्या निवेदनात शत्रुघ्न काटे यांनी लिहले आहे की, निळू फुले नाट्यगृह हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारे एक प्रमुख नाट्यगृह असून हे शहरातील एक अत्यंत महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे,जेथे अनेक नाट्यप्रयोग,संगीत मैफिली, शालेय व महाविद्यालयीन कार्यक्रम सातत्याने पार पडत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत पारदर्शकता, वेळेची बचत,गैरव्यवहार टाळणे आणि प्रक्रियेला डिजिटल स्वरूप देणे या उद्दिष्टांच्या अधीन राहून नाट्यगृहासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असावी. परंतु गेल्या काही काळात या नाट्यगृहासाठी सुरू करण्यात आलेली ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनेक अडचणी व गैरसोयींचे कारण बनली आहे. अर्जदार नाट्यगृहाच्या वेबसाइटवर जाऊन कार्यक्रमासाठी तारीख,वेळ आणि इतर माहिती भरून नोंदणी करतो. या प्रक्रियेमुळे काही त्रुटि शत्रुघ्न काटे यांच्या निदर्शनास आले , जसे की ........

१) तांत्रिक अडथळे: संकेतस्थळ वारंवार बंद पडते किंवा माहिती अपूर्ण असते.अपलोड केलेली कागदपत्रे योग्य प्रकारे सादर होत नाहीत.

२) स्थानिक कलावंतांसाठी असुविधा: अनेक कलाकार,संस्था अजूनही डिजिटल प्रणालीत पारंगत नाहीत.स्थानिक कार्यालयात प्रत्यक्ष भेटीने नोंदणी करणे त्यांना अधिक सोयीचे वाटते. ३) दुरुपयोगाच्या तक्रारी: काही वेळा आरक्षणे 'ब्लॉक' ठेवली जातात आणि इतरांना उपलब्धता दाखवली जात नाही. ऑनलाईन नोंदणीमुळे एखादी संस्था वारंवार बुकिंग करून इतर संस्थांना संधी मिळू न देणे.

४)तक्रार केल्यावर प्रतिसाद मिळण्यासाठी खूप वेळ लागतो. आपत्कालीन कार्यक्रम(शोकसभा,सन्मान सोहळे) यासाठी लवकर तारीख न मिळणे.अशा अनेक प्रश्नांकडे पालिका आयुक्तांचे लक्ष वेधण्यासाठी हे निवेदन दिले आहे आणि या निवेदांनाच्या माध्यमातून सद्य ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करावी,पारंपरिक (कार्यालयीन) नोंदणी पद्धती पुन्हा सुरू करावी, हायब्रिड (ऑनलाईन+ऑफलाईन) प्रणालीस मान्यता द्यावी,एका संस्थेला ठराविक मर्यादेपेक्षा अधिक वेळा आरक्षण करण्यास बंदी घालावी आदी.

ही मागणी फक्त तात्कालिक अडचणीसाठी नाही किंवा आमचा हेतू कोणत्याही संस्थेला डावलणे नाही,तर सर्वांना समान संधी देणे,पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे आणि पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जीवनाला गतिमान ठेवणे तसेच भावी पिढ्यांसाठी सुसंगत व्यवस्था निर्माण करण्यासाठी आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968